माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

### अपील क्रमांक : १०१५/२०२३

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. स्वप्नील विनोदराव साळवे , द्वारा –मनोज धात्रक ,मेहेर नगर ,मारोटी भाऊ समाधी जवळ ,सिंधी मेघे ,वर्धा ,जि. वर्धा -४४२००१. | उपविभागीय पोलिस अधिकारी ,पुलगाव,ता. देवळी ,जि. वर्धा. | अपर पोलिस अधीक्षक ,पोलिस अधीक्षक कार्यालय ,वर्धा ,ता. जि. वर्धा . |

**अंतरिम आदेश दिनांक : ०५.०१.२०२६**
**अंतीम आदेश दिनांक : ०२.०७.२०२६**

### निर्णय

अपिलार्थी श्री. स्वप्नील विनोदराव साळवे यांनी दिनांक १२.०४.२०२३ रोजी आयोगासमोर सादर केलेल्या व्दितीय अपीलावर आयोगाने दिनांक.०५.०१.२०२६ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे अंतरिम आदेश पारीत केले आहे.

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी ,पुलगाव ,ता. देवळी, जि. वर्धा यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती जी रेकॉर्डवर उपलब्ध आहे ,ती संपूर्ण माहिती सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसांत अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात यावी.

२. श्री. गोकुळसिंग पाटील , तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी ,पुलगाव ,ता. देवळी, जि. वर्धा यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का लादण्यात येवू नये , याचा लेखी खुलासा त्यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात आयोगास व्यक्तिशः उपस्थित राहून सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही, तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

उपरोक्त आदेशास अनुसरुन आयोग कार्यालयातून दिनांक ०५.०३.२०२६ रोजी नोटीस निर्गमित करुन संबंधितांना दिनांक २५.०३.२०२६ रोजी पर्यंत स्वंयस्पष्ट खुलाशासह आयोगात उपस्थित राहण्याबाबत सुचीत करण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक २५.०३.२०२६ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी ,पुलगाव ,ता. देवळी, जि. वर्धा श्री. गोकुळसिंग पाटील उपस्थित असून त्यांनी त्यांचा लेखी खुलासा आयोगास सादर केलेला आहे.

सदर प्रकरणी अपील क्र. १०१५/२०२३ , यात अपिलार्थी श्री. स्वप्नील विनोदराव साळवे यांनी दिनांक १२.०४.२०२३ रोजी राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जावर दिनांक ०५.०१.२०२६ रोजी सुनावणी घेवून पारीत केलेल्या अंतरिम आदेशातील मुद्दा क्र. १ बाबत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०३.२०२६ रोजी पालन केले असल्याबाबत तसेच अपिलार्थी यांना माहिती पुरविल्याबाबत आयोगाची खात्री पटली आहे. आदेशातील मुद्दा क्र.२ अन्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना खुलासा मागणी केला होता त्याबाबत श्री. गोकुळसिंग पाटील ,उपविभागीय पोलिस अधिकारी, पुलगाव ,ता. देवळी, जि. वर्धा यांनी आपला लेखी खुलासा आयोगास दि.२५.०३.२०२६ रोजी सादर केला आहे . प्राप्त खुलासा मान्य करीत व झालेला विलंब क्षमापित करीत, प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत व्दितीय अपील अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : ०२.०७.२०२६

जावक क्रमांक ५८५८ दिनांक 8 JUL 2026